नस्ती क्रमांक

FORM-1A

0058152

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. MECR 04, वर्ष Year 2024 दिनांक Date 06/02/2024
2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections 30/09/2021 ते 18/11/2021,
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from ........, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to ........, वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 13/02/2023 वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 29/2024, तारीख Date 06/02/24 वेळ Time 17.00 वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बोरीवली, ठिकाणाचे नंबर No. if any पोलीस, गल्ली Ward ठाणे, रस्त्याचे नाव Name of road मुंबई
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्रीमती गायत्री सोनी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. रवी सोनी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 31 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8600018867
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation वकील
   (g) धर्म Religion ........, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : श्री. ध्रुव्रुस गल्ली Ward / सर्व्हे नं. C/1. घर / नाव नं. House/Name No. शालिवाड फोन / मो. नं. Phone/M. No. CHS.... पॅन नं. PAN No. C.S. नं. वोटर्स नं. Card No. 1064, 1065 K, 1065 A व B
   रस्त्याचे नाव Road सर्वे नं. 113 जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place हिस्सा नं 1 व 2 गाव Village रामनाथ पोस्ट Post रोड, पो. स्टे. P. Stn. अलिबाग,
   तालुका Taluka रायगड, जिल्हा Dist. 402201, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटपर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   1) श्री. सुधीर कालेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
   2) श्री अरविंद घाग, पोलीस निरीक्षक,
   3) श्रीमती स्वप्नाली मांडे, पोलीस उप निरीक्षक, सर्व नेमणूक - बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई.

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्रीमती गायत्री रवी सोनी यांचा दिनांक 06/02/2024 रोजी स्वतंत्र कागदावर जबाब संकलित करण्यात आला असून तोच गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष

(विद्या जाधव)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

जबाब

दिनांक ०६/०२/२०२४

श्रीमती गायत्री रवी सोनी, वय ३१ वर्षे, व्यवसाय – वकील, रा.ठि. – रो हाऊस नं. सी–०१, गार्जवाड को. हौ. सोसा., सी.एस. नं. १०६४, १०६५ के. १०६५ ए आणि बी, सर्वे नं. ११३, हिस्सा नं. १ आणि २, रामनाथ रोड, मौजे – अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड. पिन कोड नंबर ४०२ २०१ मो.नं. ८६०००१८८६७, आधार कार्ड नंबर ८६७५ १६३६ ९१६९.

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर अकरा महिन्यापासुन रहावयास आहे. त्यापुर्वी मी माझी मावशी नामे संगिता कमलेशकुमार सोनी रा.ठि. बी. विंग, सी. ५७, वनश्री को. हौ. सोसा. राधाकृष्ण हॉटेल जवळ, एल.टी. रोड, बोरीवली प. मुंबई ९२ याठिकाणी रहावयास होते.

मी दिनांक १४/०२/२०२३ रोजी मा. ४६ वे विशेष सत्र न्यायालय (एसीबी), मुंबई येथे पोलीस उप निरीक्षक श्रीमती स्वप्नाली मांडे, पोलीस निरीक्षक श्री अरविंद घाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुधिर कालेकर यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियान्वये गुन्हा नोंद करण्याकरीता मिसलीनिअस ॲप्लीकेशन क्र. ३२३/२०२३ अन्वये अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावरून मा. न्यायालयाने दिनांक २४/०१/२०२४ रोजी पोउपनि स्वप्नाली मांडे, पोलीस निरीक्षक घाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कालेकर यांचेविरोधात कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार माझी फिर्यादी नोंद करण्याकरीता मला दिनांक ०२/०२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील पोलीस निरीक्षक विदया जाधव यांनी संपर्क करून कार्यालयात हजर राहण्याबाबत कळविले होते. परंतु मी माझे कोर्टाच्या कामामध्ये व्यस्थ असल्याने दिनांक ०६/०२/२०२४ रोजी जबाब नोंदविण्याकरीता कार्यालयात हजर राहते असे वकीलांमार्फत ई मेल करून पोनि विद्या जाधव यांना कळविले होते. त्याप्रमाणे मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोनि विद्या जाधव यांचेसमक्ष हजर राहून खालीलप्रमाणे जबाब नोंद करीत आहे –

दिनांक २५/११/२०२० रोजी माझा विवाह रवी उगमचंद सोनी, वय ३३ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा. ठि. – ए. १, शिवनगर, गोटन रोड, मेरता (मेडता), नागौर, राजस्थान पिन नं. ३४२ ००१ यांचेशी झाला होता. लग्नानंतर माझे पती रवी सोनी व माझे इतर सासरच्या मंडळीनी माझा छळ केल्याकारणाने मी दिनांक १८/०६/२०२१ रोजी मी, माझी मावशी व तिचे पती आणि इतर माझे परीचयाच्या व्यक्तींसोबत तक्रार नोंदविण्याकरीता बोरीवली पोलीस ठाणेस गेले होती. त्यावेळेस मी माझे तक्रारी संदर्भात बोरीवली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुधीर कालेकर व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. अरविंद घाग यांना भेटली असता सदर दिवशी पोलीस ठाणेस महिला अधिकारी नसल्याने मला त्यांनी महिला पोलीस अधिकारी कर्तव्यावर उपलब्ध होताच तक्रार घेवू असे सांगितले. त्यानंतर मी माझे घरी निघून गेले.

दिनांक २०/०६/२०२१ रोजी मी बोरीवली पोलीस ठाणेस तक्रार देण्याकरीता गेले असता, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. अरविंद घाग यांनी मला माझी तक्रार ही श्रीमती स्वप्नाली मांडे, महिला पोलीस उप निरीक्षक या घेणार असून त्यांना रात्रपाळी कर्तव्यावर आल्यावर भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व माझी मावशी श्रीमती संगीता सोनी हिचे सोबत सदर दिवशी रात्री ०९.०० वा. चे दरम्यान बोरीवली पोलीस ठाणेस जावून श्रीमती स्वप्नाली मांडे, महिला पोलीस उप निरीक्षक यांची भेट घेतली असता, त्यांनी माझे तक्रारी संदर्भात सविस्तर जबाब नोंद करून माझे पती रवी सोनी व माझे इतर सासरच्या मंडळी विरूध्द बोरीवली पोलीस ठाणे गु.र.क्र. ८४१/२०२१ कलम ४९८(अ), ४०६, ३५४, ३५४ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयाचा तक्रार श्रीमती स्वप्नाली मांडे, महिला पोलीस उप निरीक्षक यांनी केला असून माझे पती व इतर सासरच्या मंडळींविरूध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर केलेले आहे.

नमुद गुन्हा दाखल केल्यानंतर मी दिनांक ३०/०९/२०२१ रोजी माझे लग्नावेळी दिलेले एकुण रूपये २७ लाख रूपयांचे स्त्रीधन सोने व इतर ऐवज परत मिळवून देण्याकरीता स्त्री धनाची यादी मी तपासी अधिकारी यांचे नावे पत्राव्दारे बोरीवली पोलीस ठाणेस सादर केली होती. तसेच मी सदरबाबत तपासी अधिकारी पोउपनि श्रीमती स्वप्नाली मांडे यांना देखिल सांगितले होते. तसेच त्यानंतर मी मला सासरच्या मंडळीकडील झालेल्या

Scanned with OKEN Scanner

बाबतची दृक व श्राव्यचित्रण (ऑडियो आणि व्हीडिओ रिकॉर्डींग) एका सॅनडिस्क कंपनीच्या पेनड्राईव्ह मध्ये तपासी अधिकारी यांना सादर केले होते. परंतु त्या संबंधीत तपासी अधिकारी पोउपनि मांडे या आरोपीकडून स्त्रीधन हस्तगत करण्याकरीता कार्यवाही करीत नसल्याने मी पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. अरविंद घाग यांना भेटली असता, त्यांनी मला पोउपनि मांडे या सांगतिल त्याप्रमाणे कोऑपरेट करण्याबाबत मला सांगितले. त्यानंतर मी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कालेकर यांना या संदर्भात भेटली असता त्यांनी देखिल मला पोउपनि मांडे ज्याप्रमाणे सागनिल त्याप्रमाणे मला करण्यास सांगितले.

त्यानंतर मी वेळोवेळी माझे गुन्हयाच्या संदर्भात भेटण्याकरीता बोरीवली पोलीस ठाणेस जात असे तेव्हा पोउपनि मांडे, पोनि घाग व वपोनि कालेकर हे तिघेही एकत्र माझेसोबत चर्चा करायचे. तसेच पोउपनि मांडे या गुन्हयाच्या तपासा संदर्भात वेळोवेळी पोनि घाग यांचे मार्गदर्शन घेत होत्या.

त्यानंतर मी माझी मावशी संगीता सोनी हिचेसोबत मी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने तसेच माझे स्त्रीधन पुन्हा ताब्यात मिळावे याकरीता बोरीवली पो. ठाणे येथे जावुन तपासी अधिकारी पोउपनि स्वप्नाली मांडे यांना दिनांक १४/१०/२०२१ रोजी रात्री साधरणतः १०.३० वा. बोरीवली पोलीस ठाणेमधील पहिल्या माळयावर असलेल्या एका खोलीत भेटले असता, पोउपनि मांडे यांनी "माझा मोबाईल खराब झाला आहे. तरी मी नविन मोबाईल खरेदी करते व त्याची खरेदी रक्कम मला २५ ते ३० हजार रूपये द्या" अशी लाचेची मागणी केली, सदर लाचेची रक्कम तपासी अधिकारी पोउपनि मांडे यांना देण्याची माझी इच्छा नव्हती परंतु आरोपीत माझे पती व सासरच्या लोकांविरोधात कारवाई करण्यास दिरंगाई झाली होती आणि मी त्यांना लाचेची रक्कम न दिल्यास माझे काम होणार नाही अशी मला भिती वाटल्यामुळे मी दिनांक १६/१०/२०२१ रोजी पोउपनि स्वप्नाली मांडे यांना मोबाईलवर संपर्क करून त्या कर्तव्यावर असल्याची खात्री करून संध्याकाळी ७.०० वा. त्यांची भेट घेवून त्यांनी नविन मोबाईल खरेदी केला आहे किंवा कसे ? या बाबत विचारणा केली असता, पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी ओपो कंपनीच्या मोबाईल बॉक्समधील ग्रे रंगाचा नविन मोबाईल फोन काढून मला दाखविला व हा मोबाईल खरेदी केला असल्याचे सांगितले. त्यावर मी माझे मावशीकडून रोखीने घेतलेले २८ हजार रूपये (भारतीय चलनातील रू. ५०० दराच्या ५० नोटा) रोखीने पोउपनि स्वप्नाली मांडे यांना दिल्या. तेव्हा मी पोउपनि मांडे यांना अजून तुटलेला फोन का वापरता असे विचारले असता, त्यांनी सदरचा नविन फोन हा माझे गुन्हयाची चार्जशिटी कोर्टामध्ये दाखल झाल्यानंतरच वापरणार असे सांगितले. सदरची रक्कम देताना मी व पोउपनि स्वप्नाली मांडे आम्ही दोघेच होतो व पोउपनि स्वप्नाली मांडे यांचे सांगण्याप्रमाणे माझी मावशी रूमच्या बाहेर थांबून होती.

त्यानंतर दिनांक १७/१०/२०२१ रोजी मी पोउपनि स्वप्नाली मांडे भेटले असता, त्यांनी मला "दिवाली मे हम तिन्हो को क्या हेल्प करोगे" असे विचारले त्यांना पैसे देणे मला शक्य नसल्याने मी त्यांना रूपये ४,५००/– चे एकूण तीन ड्रायफ्रुटचे (सुकामेवा) बॉक्स माझे परिचयाचे दुकानामधून खरेदी करून पोउपनि मांडे, पोनि घाग व वपोनि कालेकर यांना प्रत्यक्ष भेटून दिले.

त्यानंतर दिनांक २९/१०/२०२१ रोजी पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी रात्री १०.३० वा. मला व माझे मावशीला बोरीवली पोलीस ठाणेस बोलविले व तपासात काय चालले त्याची माहिती दिली व पहिल्या माळयावरील एका खोली मध्ये नेवून असे सांगितले की, जर तुम्हाला सासरच्या मंडळींकडुन तुमचे स्त्रीधन व इतर वस्तु कलम ९४ (१ ते ३) संहिते प्रमाणे जर राजस्थान वरून मुंबईला आणावयाच्या संदर्भात त्यांनी व.पो.

समक्ष

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक ०६/०२/२०२४ रोजीचा फिर्यादी श्रीमती गायत्री सोनी यांचा फिर्यादी जबाब पुढे सुरू.....

नि. कालेकर व पो.नि. गुन्हे घाग यांच्याशी बोलणी केली असून जर मी त्यांना रू. ५,००,०००/– रोख स्वरूपात दिले तर सासरच्या मंडळीकडून स्त्रीधन तसेच कलम १६४(५)(अ) संहिते प्रमाणे मा. महादंडाधिकारी यांच्याकडे जबाब नोंदवून सासरच्या मंडळींना कडक शासन करण्यासाठी तशाप्रकारे तपास करून कलम १७३ (१ ते ७) संहिते प्रमाणे दोषारोप पत्र महानगरदंडाधिकारी बोरीवली पश्चिम यांच्याकडे दाखल करीन असे सांगितले. सदरची लाचेची मागणी ऐकल्यावर मला धक्का बसला त्यावेळी मी त्यांना दिनांक १०/११/२०२१ पर्यंत कळविते असे सांगितले, त्यानंतर दिनांक १३/११/२०२१ रोजी रात्री ११.०० वा. च्या सुमारास पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी पुन्हा आम्हाला पो. ठाणेस बोलविले व पहिल्या माळयावरील रिकाम्या खोलीत नेवून त्यांनी सांगितलेली लाचेची रक्कम आणली का असे विचारले. सदरवेळी माझेकडे कोणताच पर्याय नसल्याने त्यावेळी मी त्यांना रूपये २,००,०००/– आणले असल्याचे सांगितले व (भारतीय चलनातील रू. ५०० दराच्या ४०० नोटा) त्यांना एका खाकी कलरच्या पाकिटात सदरचे रोख २,००,०००/– रूपये दिले. सदरची रक्कम ही मी माझे मावशीकडून घेवून पोउपनि मांडे यांना दिलेली आहे. सदरची रक्कम देताना माझी मावशी ही पोउपनि मांडे यांचे सांगण्याप्रमाणे रूमच्या बाहेर थांबून होती. तसेच सदरवेळी पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी सदरची रक्कम ही व.पो.नि. कालेकर व पो.नि. गुन्हे घाग यांच्या तर्फे स्विकारली असल्याचे सांगितले. तसेच मला तुमचे काम होईल असे सांगितले व लवकरात लवकर उरलेले रूपये ३,००,०००/– रोख दिनांक १८/११/२०२१ पर्यंत आणून देण्यास सांगितले.

पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी सांगितल्याप्रमाणे उर्वरीत लाचेची रक्कम रूपये ३,००,०००/– ही मला काही आर्थिक अडचणी असल्याकारणाने लाचेची उरलेली रक्कम आरोपीत पोउपनि स्वप्नाली मांडे तसेच व.पो. नि. कालेकर व पो.नि. घाग यांना देता आली नाही. त्यामुळे वर नमुद तिन्ही पोलीस अधिकाऱ्यांनी संगनमत करून दिनांक २६/१२/२०२१ रोजी अपूर्ण पद्धतीचे म्हणचेच माझे कलम १६४(५)(अ) संहिते प्रमाणे जबाब न नोंदवताच तसेच व सासरच्या मंडळीकडून माझे कोणतेही स्त्रीधन व इतर वस्तु कलम ९४ (१ ते ३) संहिते प्रमाणे जप्त न करता दोषपूर्ण दोषारोप पत्र दाखल करून माझी फसवणूक करून वरील नमुद केलेल्या लाचेचा स्विकार केलेला आहे. म्हणुन पोउपनि स्वप्नाली मांडे, पोलीस निरीक्षक घाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कालेकर यांचेविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दिनांक १३/०२/२०२३ रोजी तक्रार अर्ज दिला. तसेच दिनांक १४/०२/२०२३ रोजी मा. ४६ वे विशेष सत्र न्यायालय (एसीबी), मुंबई येथे पोउपनि स्वप्नाली मांडे, पोलीस निरीक्षक घाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कालेकर यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियान्वये गुन्हा नोंद करण्याकरीता मिसलीनिअस ॲप्लीकेशन क्र. ३२३/२०२३ अन्वये अर्ज दाखल केला. त्या अर्जावरून मा. न्यायालयाने दिनांक २४/०१/२०२४ रोजी पोउपनि स्वप्नाली मांडे, पोलीस निरीक्षक घाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कालेकर यांचेविरोधात कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

तरी मी माझे पती व इतर सासरच्या व्यक्तींविरूध्द बोरीवली पोलीस ठाणेस नोंद केलेल्या गुन्हयाच्या तपासा दरम्यान माझे स्त्रीधन हस्तगत करण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कालेकर व पोलीस निरीक्षक घाग यांना भेटले असता त्यांनी मला गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउपनि स्वप्नाली मांडे जे सांगतिल त्याप्रमाणे कोऑपरेट करा तुमचे काम होईल असे सांगितले. त्याप्रमाणे मी तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक स्वप्नाली मांडे यांना माझे स्त्रीधन हस्तगत करण्याबाबत सांगितले असता त्यांनी माझेकडून दिनांक १४/१०/२०२१ रोजी

समक्ष

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक ०६/०२/२०२४ रोजीचा फिर्यादी श्रीमती गायत्री सोनी यांचा फिर्यादी जबाब पुढे सुरू.....

नविन मोबाईल खरेदी करण्याकरीता प्रथम २५ ते ३० हजार रूपयांच्या लाचेची मागणी करून दिनांक १६/१०/२०२१ रोजी माझेकडून नविन मोबाईल खरेदी केला असे सांगून मोबाईलची खरेदी किंमत म्हणून २५,०००/— इतक्या लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर दिनांक १७/१०/२०२१ रोजी माझेकडे पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी माझेकडे ''दिवाली मै हम तिन्हो को क्या हेल्प करोगे'' असे विचारून पुन्हा लाचेची मागणी करून पोउपनि स्वप्नाली मांडे, पोनि घाग व वपोनि कालेकर यांनी माझेकडून रूपये ४,५००/— चे एकूण तीन ड्रायफ्रुटचे (सुकामेवा) बॉक्स स्विकारले. तसेच दिनांक २९/१०/२०२१ रोजी पोउपनि स्वप्नाली मांडे यांनी माझेकडे गुन्हयाच्या तपासाच्या दरम्यान माझे स्त्रीधन हस्तगत करण्याकरीता व माझे गुन्हयाच्या संदर्भात न्यायालयात कलम १६४(५)(अ) अन्वये जबाब नोंद करण्याकरीता आणि आरोपीतांना कडक शासन करण्यासाठी रूपये ५,००,०००/— ची मागणी करून दिनांक १३/११/२०२१ रोजी रूपये २,००,०००/— व.पो.नि. कालेकर व पो.नि. गुन्हे घाग यांच्या तर्फे पोलीस उप निरीक्षक स्वप्नाली मांडे यांनी स्विकारले म्हणून माझी बोरीवली पोलीस ठाणेचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुधीर कालेकर, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. अरविंद घाग व महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती स्वप्नाली मांडे यांचेविरूध्द तक्रार असून त्यांचेवर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा वरील जबाब हा मराठीतुन संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मला वाचुन हिंदीतून समजावुन सांगितला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(विद्या जाधव)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे मा. न्यायालयाच्या आदेशान्वये.

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद, तारीख, वेळी व ठिकाणी, यातील फि. यांनी त्यांचे पती व सासरच्या लोकांविरुद्ध बोरीवली पो.ठाणेस दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान फि. यांचे स्त्रीधन हस्तगत करून देण्याकरीता आलोसे क्र. 1 व 2 यांनी फि. यांना आलोसे क्र. 3 हे सांगतील त्याप्रमाणे कोऑपरेट करा तुमचे काम होईल असे सांगितले. त्याप्रमाणे आलोसे क्र. 3 यांनी दि. 14/10/2021 रोजी नविन मोबाईल खरेदी करण्याकरीता 25 ते 30 हजार रुपयांची मागणी करून दि. 16/10/2021 रोजी 25,000/- लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर दि. 17/10/2021 रोजी फि. यांचेकडे आलोसे क्र. 3 यांनी "दिवाली में हम तिनो का क्या हेल्प करोगे" असे विचारुन फिर्यादी यांचेकडून रु. 4,500/- ची

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो.नि. विद्या जाधव

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

[illegible] तीन ड्रायफ्रुट बॉक्स आलोसे क्र. 1, 2, 3 यांनी स्विकारले तसेच फि. यांचे स्त्रीधन हस्तगत करण्यासाठी गुन्ह्याच्या संदर्भात 164(5)(अ) अन्वये मा. न्यायालयात जबाब नोंद करण्याकरीता आणि आरोपीतांना कडक शासन करण्याकरीता रु. 5,00,000/- लाचेची मागणी करून त्यातील रु. 2,00,000/- हे आलोसे क्र. 1 व 2 यांचे तर्फे आलोसे क्र. 3 यांनी स्विकारले म्हणून आलोसे क्र. 1, 2, 3 यांचेविरुद्ध कलम 7 भ्र.प्र. अधि. अन्वये गुन्हा नोंद.

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ................................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही / अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name विद्या जाधव

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई.

Posting

Code No. of I. O. ................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner